# अन्नवह स्त्रोतस - दुष्टिहेतु - लक्षणे, व्याधि हेतु - लक्षणे विवरण

## ) अन्नवह स्त्रोतस )

**देहेऽन्नमयाः सर्वभावाः ।**

अ.सं. शा. 6

शरीरातील सर्व घटक अन्नमय आहेत. या अन्नाचे ग्रहण व परिणमन ज्या प्रणालीशी संबंधित आहे ते अन्नवह स्त्रोत होय.

**अन्नवहानां स्त्रोतसामामाशयो मूलं वामं च पार्श्वम् ।**

च. वि. 5

अन्नवह स्त्रोतसाचे मूल स्थान आमाशय व वामपार्श्व होय या स्त्रोतसात मुख, गल, अन्ननलिका, आमाशय व पच्चमानाशय ( ग्रहणी, लघ्वन्त्र ) या अवयवांचा समावेश होतो. या स्त्रोतसात अन्नपचनाचे कार्य पुढील प्रमाणे संपन्न होते.

**स खलु विधिवद् अभ्यवहृतम् अन्नजातं प्राणेन वायुना कोष्टमाकृष्टम् द्रवैर्विभिन्न संघातं स्नेहेन मृदूकृतं अभिसंधुक्षितः समानेन आमाशयस्थ स्थालिस्थमिव अम्बुतंडुलम् अंतरग्निः पचति ।**

अ. सं. शा. 6

हारकंगात

विधिवत ग्रहण केलेले अन्न प्राणवायुने कोष्ठात आणले जाते. जेथे द्रव व स्नेहाने मृदु होऊन आमाशयस्य समानाने संधुक्षित होऊन ज्या प्रमाणे अग्नि भांड्यातील तांदुळ शिजवतो त्या प्रमाणे अन्तरग्निने या अन्नाचे पचन होते.

अन्नवह स्त्रोतसाच्या कार्यात प्राण समान व व्यान वायु, पाचक पित्त व बोधक आणि क्लेद कफ यांचा मुख्यत्वे सहभाग असतो.

अन्नग्रहण हे प्राणवायुचे कार्य आहे.

**वायुर्यो वक्त्रसंचारी स प्राणोनाम देहधृक् ।**
**सोऽन्नं प्रवेशयत्यन्तः प्राणांश्चाप्यवलंबते ।।**

सु. नि. ।

स्थानं प्राणस्य शीर्षोरःकण्ठजिव्हाऽऽस्यनासिकाः ।
ष्ठीवनक्षवथूद्गारश्वासाहारादि कर्म च ।।

च. चि. 25

आहारादि इत्यत्र आदिग्रहणाद् अन्नविधारण
निःसरणादिनि गृह्यन्ते ।

चक्रदत्त

अन्नमादानकर्मा तु प्राणः कोष्ठं प्रकर्षति ।

च.चि. 15

........ प्राणोऽत्र मूर्धगः ।
उरःकंठचरो बुध्दिहृदयेंद्रियचित्तधृक् ।
ष्ठीवनक्षवथूद्गार निश्वासान्नप्रवेशकृत् ।।

Th 11675

अ. हृ. सू. 12

वरील संदर्भावरुन हे सुस्पष्ट होते कि मुख, जिव्हा, कण्ठ, उर, शिर, नासिका ही प्राणाची स्थाने आहेत. व अन्नवह स्त्रोतसा संबंधित अन्न ग्रहण, चर्वणार्थ धारण व निःसरण या क्रिया प्राणांकडून केल्या जातात.

जिव्हामूलकंठस्तु जिव्हेन्द्रियस्थ सौम्यत्वात् सम्यक् रसज्ञाने प्रवर्तते ।

सु. सू. 21

रस बोधनात् बोधको रसनास्थायी ।

वा. सू. 12

रसनास्यः सम्यग्रसबोधनाद बोधकः ।

असं. सू. 20

बोधक कफाचे स्थान व कार्य वरील संदर्भावरुन सुस्पष्ट होते. जिव्हा व कंठाच्या ठिकाणी राहून रसाचे ज्ञान करवून देण्याचे कार्य हा कफ प्रकार करतो. तसेच

आप्यस्वभावाने चर्वणाच्या वेळी अन्न शिथिल करण्याचेही कार्य करतो. आमाशयात अन्नप्रवेश झाल्यावर क्लेदक कफाचे कार्य सुरु होते. आहारास क्लिन्न व भिन्नसंघात करुन पचनास सुलभ बनविणे हे क्लेदक कफाचे कार्य होय. यावेळी अन्नाचा मधुर अवस्थापाक होतो.

स च तत्र औदके: गुणै: आहार: प्रक्लिन्न: भिन्नसंघात: सुखतरश्च भवति ।

सु. सू. 21

आमाशयस्थित: अन्नसंघातस्य क्लेदनात् क्लेदक: ।

अ.सं. सू. 20

यत्वामाशयसंस्थित: ।
क्लेदक: सोऽन्नसंघातक्लेदनात् ।।

अ. हृ. 12

या नंतर समान वायु व पाचक पित्त यांचे कार्य अन्नावर होते. समानाचे कार्यक्षेत्र आमाशय व पच्चमानाशय-ग्रहणी पक्वाशय हे असून अन्नपचनार्थ अग्निसंधुक्षणाचे काम तसेच अन्नाचे धारण, पचन, सार किट्ट विवेचनाचे व मोचनाचे कार्य समानाकडून होते हे पुढील संदर्भानुसार स्पष्ट होते.

अन्तरग्नेश्च पार्श्वस्थ: समानोऽग्निर्बलप्रद: ।

च. चि. 28

आमपक्वाशय चर: समानो वह्निसंगत: ।
सोऽन्नं पचति तज्जांश्च विशेषान् विविनाक्ति हि ।

सु. नि. 1

अन्न पचनाच्या कार्यात व्यान वायुचा ही सहभाग आवश्यक गति, स्थानांतर व सार किट्ट विभजनार्थ आहे हे पुढील संदर्भात उल्लेखित आहे.

**व्यानो हृदि स्थितः कृत्स्नदेहचारी महाजवः ।**

**गत्य पक्षेपणोत्क्षेपनिमेषोन्मेषणादिकाः ।**

**प्रायः सर्वाः क्रियास्तस्मिन् प्रतिबध्दाः शरीरिणाम् ।**

अ. हृ. 12

**आदि ग्रहणेन जृंभण-अन्नास्वादन - विशोधनादिपरिग्रहः ।**

**व्यानो हृदि अवस्थितः कृत्स्नदेहचरः - शीघ्रतरगतिः,**

**गति-प्रसारण- आकुंचन-उत्क्षेप-अवक्षेप-निमेष-उन्मेष-जृंभण-अन्नस्वादन-स्त्रोतोविशोधन - स्वेदासृक्स्त्रावणादिक्रियः, योनौच शुक्रप्रतिपादनः विभज्य च अन्नस्य किट्टात् सारं तेन क्रमशः धातूंस्तर्पयनि ।**

अ. सं. सू. 20

सार किट्ट विभजनानंतर कटु अवस्थापाक पूर्ण होतो. अशा प्रकारे अन्नवह स्त्रोतसातील अन्नपरिणमनाचे कार्य संपन्न होते. सारभाग अन्नरसापासून धातूंचे पोषण होते ही क्रिया संक्षेपतः पुढील सूत्रात वर्णिलेली आहे.

**अभिनवमृत्कुम्भजललवस्यन्दनन्यायेन सुक्ष्मस्त्रोतोनुप्रवेशितया सोऽन्नरसो धात्वाप्यायन मात्रं करोत्येव ।**

मा. नि. 5

आहार रसाचे रसवाहिन्यातून वहन होत असतांना मृत्कुंभस्यंदन न्यायाने सूक्ष्म वाहिन्यातील पातळ आवरणातून स्यंदन व धातूंच्या सूक्ष्म स्त्रोतसांत प्रवेश होऊन धातूंचे पोषण होते.

अर्वाचीन वैद्यकानुसार अन्नवह स्त्रोतसाच्या रचना व कार्याचे विवेचन या नंतर केलेले आहे.

* * * * *

## DIGESTIVE SYSTEM

The digestive or alimentary canal extends from the mouth, through which the food enters the body, to the anus through which residue escapes. Its function is two fold:(1) To convert the food into a digestible form in which it can be assimilated; (2) absorb the food thus digested. Briefly, its functions are digestion and absorption. Digestion is begun in the mouth and continued in the stomach. Absorption is accomplished by the small intestine, although digestion also takes place in the upper portion of that tube. The digestive tract has been compared to a modern factory, for it is completely automated and the owner's merely consist of ordering bulk supplies and of disposing of the output.

We may, arbitrarily, divide the alimentary canal into an upper part-the mouth, esophagus, and stomach, and a lower part-the small and large intestines.

## STRUCTURE AND FUNCTION

The lower digestive tract consists of 2 divisions, which differ in structure and function; they are called the small and the large intestine. The names apply to their diameter, not to their length; the small intestine

is about 20 feet long and the large intestine is about 5 feet long. The small intestine consists of a short upper section ( 12 inches), the duodenum, into which open the bile duct from the liver and gallbladder and the pancreatic duct; a longer lower section, the upper part of which is called the jejunum and the lower three-fifths, the ileum. The lower end of the ileum connects with the large intestine at the ileocecal valve, situated in the lower right part of the abdomen. The vermiform appendix opens into the large bowel just beyond it. The large intestine begins as a wide pouch the cecum, and continues as the colon, which passes up into the right flank, across the abdomen beneath the liver and stomach, and down into the left flank, to become the sigmoid, an S-shaped portion, finishing as the rectum, which is about 5 inches long and opens onto the surface at the anus.

The small intestine is concerned with the digestion and absorption of the food, and its structure is designed to perform these 2 different functions. The mucous membranc lining this part of the bowel contains innumerable glands in the form of simple tubes, which secrete enzymes that act on food that has begun to be digested but is not yet absorbed.

The pancreas, a flat organ that lies transversely behind the stomach, synthesizes powerful secretions (lipase, amylase, chymotrypsinogen) that enter the bowel lumen at the same place as bile. By the emulsifying action of bile and the chemical action of enzymes on the foodstuffs in the upper bowel, digestion is enhanced and absorption can being.

The Surface of the jejunum is arranged in small projections called villi, which look to the naked eye like velvet. Each villus is composed of hundreds of thousands of intestinal absorptive cells that overlie the core of blood vessels and lymphatics. Each absorptive cell itself is further modified to increase its surface area by the projection of microvilli on its surface, the brush border. it has become apprent that these adaptations, which increase the surface area over 40-fold, facilitate absorption of the molecules that have been made available by digestive processes. It seems that different sugars, fats, and aminoacids are absorbed preferentially at different levels in the small bowel.

The absorption at the surface of each cell is facilitated by the presence of extracellular enzymes that lie between the microvilli. All molecules that are absorbed pass into the intestinal cell and are then released into the extracellular space, the lymphatics, or the portal vein, whence they travel to the liver and are used or stored. - **Boyd's Introduction to the Study of Disease**

## ( अन्नवह स्त्रोतसाचे व्याधि )

अन्नग्रहण, पचन, विवेचन, मुञ्चन या अन्नवह स्त्रोतसासंबंधीच्या कार्याचा क्रमशः विचार या पूर्वी केला. योग्य आहार द्रव्यानीयुक्त व विधिवत् सेवन केलेले भोजन स्वस्थ व्यक्तित योग्य प्रकारे परिणमन प्रक्रिया होऊन शरीरस्य सर्व भावांचे पोषण करते व शरीराची नित्यकर्मे सुरळीत सुरु ठेवते. अन्नवह स्त्रोतसाचे कार्य मुखापासून ग्रहणी- लघ्वन्त्रापर्यंतच्या अवयवात संपन्न होते. प्राण, समान, व्यान वायु बोधक केदक कफ व पाचक पित्त या कार्यासाठी मुख्यतः आवश्यक असलेले दोष प्रकार आहेत. या अवयवांची व दोष प्रकारांची प्राकृत स्थिति असणे हे अन्न परिणमनाचे कार्य व्यवस्थित होण्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे. रोगमार्गानुसार अन्नवह स्त्रोतसाचा समावेश कोष्ठात होतो. मुखापासून गुदापर्यंतच्या महा-स्त्रोतसाचा अेक भाग म्हणजे अन्नवहस्त्रोतस होय.

**अंतःकोष्ठो महास्त्रोत आमपक्वाशयाश्रयः ।**

अ. हृ. सू. 12

अन्नावरील प्रत्यक्ष पचन संस्कारासाठी पाचक पित्ताचे महत्व तुलनेने अधिक आहे. अन्नाचे शरीराभावात रुपांतर करण्याचे कार्य अग्नि पाचक पित्ताच्या रुपाने करतो.

**अग्निरेव शरीरे पित्तांर्गतः कुपिताकुपितःशुभाशुभानि करोति ।**

च. सू. 12

पित्तांतर्गत असा अग्नि शरीरात कुपित नसतांना शुभ व कुपित असतांना अशुभ - व्याधि उत्पादक ठरतो.

तेज गुणाच्या अधिक्याने सोमगुणाचा क्षय झाल्याने त्यक्तद्रवत्व या स्वभावाने हा पाचक पित्तरुपातील अग्नि आहाराचे पचन करुन त्याचे शरीरभावात रुपांतर करतो.

अर्थातच शरीरात स्वास्थ्य व अस्वास्थ्य या दोन्ही बाबतीत प्राकृत व विकृत अग्निच कारणीभूत आहे हे स्पष्ट आहे. व म्हणूनच 'रोगासर्वेऽपि मंदेऽग्नौ ।' हे विधान सार्थ आहे व व्याधिचा आमय हा पर्यायही युक्त आहे.

या अंतराग्निचे स्थान ग्रहणी हे वर्णिलेले आहे. अन्नवहस्त्रोतसांतर्गत लघ्वन्त्र या अवयवास त्याच्या कार्यानुरुप ग्रहणी, पित्तधरा कला, पच्चमानाशय असे संबोधिले जाते. या ठिकाणी स्थित राहून अंतराग्नि किंवा कोष्ठाग्नि, अन्नावर पचन संस्कार करण्याचे कार्य करतो - पुढील संदर्भावरुन हे स्पष्ट होते.

अग्नयधिष्ठानमन्नस्य ग्रहणाद्‌ग्रहणी मता ।
नाभेरुपरि सा ह्यग्निबलोपस्तम्भबृंहिता ।।
अपक्वं धारयत्यन्नं पक्वं सृजति पार्श्वतः ।
दुर्बलाग्निबला दुष्टा त्वाममेव विमुञ्चति ।।

च. चि. 15

षष्ठी पित्तधरा नाम या कला परिकीर्तिता ।
पक्वामाशयमध्यस्था ग्रहणी सा प्रकीर्तिता ।।

सु. उ. 40

षष्ठी पित्तधरा नाम पक्वामाशयमध्यस्था । सा ह्यन्तरग्नेरधिष्ठानतयामाशयात् पक्वाशयोन्मुखमन्नं बलेन विधार्य पित्ततेजसा शोषयति पचति पक्वं च विमुञ्चति ।

अ. सं. शा 5

अन्नवहस्त्रोतसातील अवयवात ग्रहणी हा अवयव अन्नपरीणमनाच्या कार्याच्या दृष्टीने सर्वात महत्वाचा आहे. कारण पाचकाग्नि ग्रहणीच्या आश्रयाने रहातो. तसेच पचनास आवश्यक कालपर्यंत अन्नाचे ग्रहण करणे, त्या अन्नाचे सम्यक् पचन करणे सार किट्ट भागाचे विवेचन करणे व त्याचे मुञ्चन करणे ही कार्ये ग्रहणी मध्ये होतात. म्हणूनच ग्रहणीचे महत्व योग्य आहार परिणमनाच्या दृष्टिने तसेच यातील विकृतिच्या दृष्टिनेही लक्षात घेणे आवश्यक ठरते. कारण अग्निविकृति म्हणजे ग्रहणीची कार्यतः विकृति होय. ही विकृति अन्नवहस्त्रोतसाच्या सर्वच व्याधीत आढळते. ग्रहणी व्याधीमध्ये या बरोबर ग्रहणीची अवयवतः दुष्टि आढळते.

अन्नवह स्त्रोतसाच्या सर्वच व्याधींमध्ये हेतू स्वरुप अग्निविकृति व अग्निविकृति उत्पन्न करणारे हेतू हे कारणस्वरुप असतात. व्याधी स्वरुप, ૩ स्वभाव, दोष प्राधान्य इत्यादिनुसार भिन्न हेतू आढळले तरी त्या सर्व हेतूंनी अग्निविकृति व त्यामुळे अन्नवह स्त्रोतसाच्या कार्यातील विकृति, कालांतराने अवयवतः विकृति विविध लक्षणांच्या रूपाने अन्नवह स्त्रोतसाच्या व्याधींमध्ये आढळते.

अन्नवह स्त्रोतसाचे दुष्टिहेतु असे आहेत.

**अतिमात्रस्यचाकाले चाहितस्य च भोजनात् ।**
**अन्नवाहिनि दुष्यन्ति वैगुण्यात् पावकस्य च ।।**

च. वि. 5

अतिमात्रेत, अकाली अहितकर आहार सेवन व अग्निवैगुण्य यांनी अन्नवह स्त्रोत दुष्ट होते. व दुष्टि लक्षणे पुढील प्रमाणे आढळतात.

**अनन्नाभिलषणमरोचकविपाकौ च्छर्दि ७च दृष्ट्वान्नवहान्यस्य स्त्रोतांसि प्रदुष्टानीति विद्यात् ।**

च. वि. 5

अनन्नभिलाषा, अरोचक, अविपाक व च्छर्दि ही लक्षणे अन्नवहस्त्रोतस दुष्ट झाल्यावर निर्माण होतात.

सर्वच स्त्रोतसांच्या विशुध्दतेचे महत्त्व वाग्भटानी असे वर्णिले आहे.

**जीवितायतनान्यन्तः स्त्रोतांस्याहुस्त्रयोदश**
**प्राणधातुमलाम्भोन्नवाहीनि अहितसेवनात् ।**
**तानि दुष्टानि रोगाय, विशुध्दानि सुखाय च ।।**

अ. हृ. शा. 3

जीविताचे अधिष्ठान असणारी प्राण, सप्तधातु, तीन मल, उदक अन्नवह अशी तेरा स्त्रोतस आहेत. अहित सेवनाचे ती दुष्ट होऊन रोग निर्माण होतात. विशुध्द स्त्रोतसे आरोग्य व सुखदायक आहेत.

* * * * *

## ( अग्निमांद्य )

अग्नि विकृति मुळे पचनाचे कार्यही बिघडते - सार भागाची उत्पत्ति व्यवस्थित न झाल्याने धातुपोषणाची प्रक्रिया मंदावते म्हणून या व्याधीस अग्निमांद्य म्हटले आहे.

अग्निमांद्याचे हेतु व संप्राप्ति पुढील प्रमाणे वर्णिले आहेत.

**अभोजनादजीर्णाति भोजनाद्विषमाशनात् ।**
**असात्म्यगुरुशीतातिरुक्ष संदुष्टभोजनात् ।।**
**विरेकवमनस्नेहविभ्रमाद्व्याधिकर्षणात् ।**
**देशकालर्तुवैषम्याद्वेगानां च विधारणात् ।।**
**दुष्यत्याग्नि:, स दुष्टोऽन्नं न तत् पचतिलघ्वपि ।**
**अपच्यमानं शुक्तत्वं यात्यन्नं विषरुपताम् ।।**

च. चि: 15

अनशन करणे, अतिभोजन करणे, विषमाशन, असात्म्य, गुरु, शीत, अतिरुक्ष, दुष्ट अन्नसेवन, विरेचन वमन स्नेहन या कर्मांचा मिथ्यायोग होणे, व्याधिमुळे शरीरकर्षण होणे, देश कालऋतु यांचे वैषम्य होणे वेगधारण करणे या मुळे अग्नि दुष्टि होते व हा दुष्ट अग्नि लघुआहाराचे ही पचन करु शकत नाही. न पचलेल्या आहारास शुक्तत्व येऊन हे अन्न विषसमान होते.

वरील हेतुंनी दोषप्रकुपित होऊन अग्निदुष्टि करतात. दोषांनाहि विगुण करणारा अग्नि असतो यांचा परस्पर संबंध बहुतांशी व्याधीत आढळतो.

**ते च प्रायशो दुष्यन्ति अग्निदोषात् ।**

अ. सं. शा. 6

अग्निमांद्याचे प्रकार पुढील प्रमाणे वर्णिलेले आहेत.

**मन्दस्तीक्ष्णोऽथ विषमः समश्चेति चतुर्विधः ।**

**कफपित्तानिलाधिक्यात्तत्साम्याज्जठरोऽनलः ।।**

मा. नि.

मन्द, तीक्ष्ण, विषम हे अनुक्रमे कफ, पित्त, वात दोषांच्या अधिक्याने होणारे तीन प्रकार व सम हा त्रिदोष साम्याने होणारा जाठर अग्निचा प्रकार होय. हे प्रकार प्रकृतिनुसारही आढळतात. यात त्रिदोष साम्याने होणारा समाग्नि हा वगळता अग्निमांद्याचे तीन प्रकार आढळतात.

प्रकारानुसार लक्षणे अशी आहेत :-

**विषमो वातजान् रोगान् तीक्ष्णः पित्तनिमित्तजान् ।**

**करोत्यग्निस्तथा मन्दो विकारान् कफसंभवान् ।**

मा. नि.

अन्नपचनातील विषमता वातज अग्निमांद्यात आढळते व त्या पासून वातज विकार होतात. विकृतिस्वरुप तीक्ष्ण झालेला अग्नि धातुविशोषण करतो. पित्तज विकारास कारणीभूत होतो. अल्प अन्नाचेही पचन करु न शकणारा मंदाग्नि होय. तो कफज विकारांची उत्पत्ति करतो.

**विषमो धातुवैषम्यं करोति विषमंपचन् ।**

**तीक्ष्णो मन्देन्धनो धातून् विशोषयति पावकः ।।**

च. चि. 15

# ( अजीर्ण )

सेवन कलेला आहार पचनसंस्कार न होता अन्नवह स्त्रोतसात पडून रहाणे या व्याधीस अजीर्ण म्हणतात.

अजीर्ण व्याधीची कारणे व संप्राप्ति पुढील प्रमाणे :-

**अत्यम्बुपानाद्विषमाशनाच्च संधारणात्स्वप्नविपर्ययाच्च ।**
**कालेऽपि सात्म्यं लघुचापि भुक्तमन्नं न पाकं भजते नरस्य ।।**
**ईर्षाभयक्रोधपरिप्लुतेन लुब्धेन रुग्दैन्य निपीडितेन ।**
**प्रद्वेषयुक्तेन च सेव्यमानमन्नं न सम्यक्परिपाकमेति ।।**

सु. सू. 46

अधिक मात्रेत पाणी पिणे, विषमासन, वेगाविधारण, स्वप्न विपर्यय ( रात्री जागरण व दिवास्वाप ) या कारणांमुळे योग्य काली, सात्म्य, लघु आहाराचे सेवन केले असताही त्याचे पचन होत नाही.
ईर्ष्या, भय, क्रोध, लोभ, रोग्यदैन्य, मत्सर या मानसभावांमुळे सेवन केलेल्या अन्नाचा सम्यक् परिपाक होत नाही.

**मात्रयाऽप्यभ्यवहृतं पथ्यंचान्नं न जीर्यति ।**
**चिन्ता-शोक-भय-क्रोध-दुःखशय्या-प्रजागरैः ।।**

च. वि. 2

चिन्ता, शोक, भय, क्रोध, दुःखशय्या, जागरण या कारणामुळे योग्यमात्रेतील पथ्यकर आहाराचे ही पचन होत नाही.

अर्थात् या कारणां सोबत अपथ्यकर आहार, नियमांचे उल्लंघन करुन घेतलेला आहार हा अधिक पीडाकर होईल हे स्पष्ट आहे.

**न च खलु केवलमतिमात्रेववाहारराशिमामप्रदोषकरमिच्छन्ति अपि तु खलु गुरुरुक्षशीतं शुष्कद्विष्टविष्टम्भिविदाह्यशुचिविरुध्दानामकाले चान्नपानानामुपसेवनम् ।**
**कामक्रोधलोभमोहेर्ष्याह्रिशोकामनोद्वेगभयोपतप्तमनसा वा यदन्नपानमुपयुज्यते, तदप्याममेव प्रदूष्यति ।**

च. नि. 2

केवळ अतिमात्रेतील आहार राशी आम प्रदोषकर होत नाही तर गुरु, रुक्ष, शीत, शुष्क, विष्टंभी, विदाही, अशुध्द, विरुध्द अकाली अन्नसेवन ही त्यास कारणीभूत आहे. काम, क्रोध, लोभ, मोह, इर्ष्या, लज्जा, शोक, मनोद्वेग, भय, तप्तमन हे मानसभाव असता सेवन केलेले अन्न ही आमप्रदोषकर आहे.

**अजीर्ण व्याधीची लक्षणे अशी आहेत -**

**तस्य लिङमजीर्णस्य विष्टम्भः सदनं तथा ।**
**शिरसो रुक् च मूर्च्छा च भ्रमः पृष्ठकटिग्रहः ।।**
**जृम्भाङ्गमर्दस्तृष्णा च ज्वरच्छर्दिः प्रवाहणम् ।**
**अरोचकोऽविपाकश्च ।**

च. चि. 15

विष्टंभ, अंगसाद, शिरःशूल मूर्च्छा, भ्रम, पृष्ठकटिग्रह, जृंभा, अंगमर्द, तृष्णा, ज्वर, च्छर्दि, प्रवाहण, अरुचि व अविपाक ही अजीर्णाची लक्षणे होत.

अजीर्णाचे पुढील प्रकार वर्णिलेले आहेत :-

**आम विदग्धं विष्टब्धं कफपित्तानिलैस्त्रिभिः ।**
**अजीर्णं केचिदिच्छन्ति चतुर्थं रसशेषतः ।**

सु. सू. 46

कफापासून आमाजीर्ण, पित्तापासून विदग्धाजीर्ण, वातापासून विष्टब्धाजीर्ण हे तीन प्रकार रसशेषाजीर्ण हे चतुर्थ अजीर्ण होय.

तसेच या प्रकारांत आढळणारी लक्षणे पुढील आहेत.

**तत्रामे गुरुतोत्क्लेदः शोथो गण्डाक्षिकूटगः ।**
**उद्गारश्चयथाभुक्तमविदग्धः प्रवर्तते ।।**
**विदग्धे भ्रमतृण्मूर्च्छाः पित्ताच्च विविधा रुजः ।**
**उद्गारश्च सधूमाम्ल स्वेदो दाहश्च जायते ।।**
**विष्टब्धे शूलमाध्मानं विविधा वातवेदनाः ।**
**मलवाताप्रवृत्तिश्च स्तम्भो मोहोङ्गपीडनम् ।।**
**रसशेषेऽन्नविद्वेषो हृदयाशुध्दिगौरवे ।**

मा. नि. अग्निमांद्य

आमाजीर्णात गौरव, च्छर्दिची भावना होते, गंड व अक्षिकूटाच्या स्थानी शोथ निर्माण होतो. सेवन केलेल्या अन्नाची अविदग्ध अशी उद्गार प्रवृत्ति होते.

विदग्धाजीर्णात भ्रम, तृष्णाधिक्य, मूर्च्छा, पित्ताच्या विविध वेदना, सधूम अम्ल उद्गार, स्वेद प्रवृत्ति व दाह ही लक्षणे आढळतात.

विष्टब्धाजीर्णात शूल, आध्मान, विविध वाताच्या वेदना, पुरीष, अधोवाताची अप्रवृत्ति, स्तंभ, मोह, अंगमर्द ही लक्षणे आढळतात.

तर रसशेषाजीर्णात अन्नद्वेष, हृदयअशुध्दि व गौरव ही लक्षणे आढळतात.

# ‖ ग्रहणी ‖

**ग्रहण्याः रोगः ग्रहणीरोगः**

मा. नि. ग्रहणी निदानम्

ग्रहणी अवयवाचा रोग अर्थात ग्रहणीची कार्यतः अवयवतः दुष्टि ज्या व्याधीत होते त्यास ग्रहणी रोग म्हटले आहे.

ग्रहणी रोगाची कारणे पुढील प्रमाणे वर्णिली आहेत.

**अतीसारे निवृत्तेऽपि मन्दाग्नेरहिताशिनः ।**
**भूयः संदूषितो वह्निर्ग्रहणीमभिदूषयेत् ।।**

सु. उ. 40

**द्रवसरणसाधर्म्यात्परस्परानुबन्धित्वाच्यातीसारानन्तरंग्रहणी ।**

मा. नि. ग्रहणीनिदानम् ।

अतिसार व्याधि बरा झाल्यावर अग्निमांद्य असतांना अहिताशन केले असता अग्नि अधिकच मंद होऊन ग्रहणी व्याधि होतो. अतिसार व ग्रहणीचे अशा प्रकारे परस्परांशी अनुबन्धित्व आढळते. द्रवसरण स्वभावाचे साधर्म्य आढळते म्हणून अतिसारानंतर ग्रहणी वर्णन आहे. परंतु वरील प्रमाणे प्रत्येक वेळी अतिसारानंतरच ग्रहणी व्याधि होतो असे नाही. अग्निमांद्य निर्माण करणारे हेतु दीर्घकाल घडले तरी ग्रहणी व्याधि होतो.

ग्रहणीचे प्रकार व सामान्य लक्षणे अशी आहेत.

**एकशः सर्वशश्चैव दोषैरत्यर्थमुच्छ्रितैः ।**
**सा दुष्टा बहुशो भुक्तमाममेव विमुञ्चति ।।**
**पक्वं वा सरुजं पूति मुहुर्बध्दं मुहुर्द्रवम् ।**
**ग्रहणी रोगमाहुस्तमायुर्वेदविदो जनाः ।।**

सु. उ. 40

एक दोषज तीन व सान्निपातिक असे ग्रहणी प्रकार आहेत. ग्रहणी दुष्टि झाल्याने सेवन केलेले अन्न कधी अपक्व अवस्थेत तर कधी पक्व असे बाहेर टाकले जाते. सरुज, पूतियुक्त कधी बध्द तर कधी द्रव असा मल असतो. अष्टांग आयुर्वेदाचे ज्ञान असणारे यास ग्रहणी रोग म्हणतात.

अन्य लक्षणे अशी आहेत·

**अथ जाते भवेज्जन्तुः शूनपादकरःकृशः ।**
**पर्वरुग्लौल्यतृट्छर्दिज्वरारोचकदाहवान् ।।**
**उद्गिरेच्छुक्ततिक्ताम्ललोहधूमामगन्धिकम् ।**
**प्रसेकमुखवैरस्यतमकारुचिपीडितः ।।**

सु. उ. 40

हस्तपादशोथ कृशता, पर्वसंधीपीडा, सर्वरस लौल्य, तृष्णा, छर्दि, ज्वर, अरोचक दाह ही लक्षणे आढळतात. छर्दि शुक्त, तिक्त अम्लरसाची लोहधूम गंधाची असते. प्रसेक, मुखवैरस्य श्वासकृच्छ्रता, अरुचि या लक्षणांनी रुग्ण पीडित असतो.

दोषानुसार लक्षणे पुढील प्रमाणे आहेत.

**वाताच्छूलाधिकैः पायुहृत्पार्श्वोदर मस्तकैः ।**
**पित्तात् सदाहैर्गुरुभिः कफात्रिभ्यास्त्रिलक्षणैः ।।**

सु. उ. 40

वातज ग्रहणीत गुद, हृदय, पार्श्व, उदर, शिर या ठिकाणी शूल अधिक असतो. पित्तज ग्रहणीत या स्थानी दाह तर कफज ग्रहणीत या स्थानी गौरव ही तीन दोषांची तीन लक्षणे उल्लेखित स्थानी आढळतात.

चरकाचार्यांनी ग्रहणी व्याधीचे दोषानुसार हेतू व लक्षणे यांचे विवेचन पुढील प्रमाणे केले आहे.

वातज ग्रहणी :-

कटुतिक्त कषायातिरुक्षशीतल भोजनैः ।
प्रमितानशनात्यध्ववेगनि ग्रह मैथुनैः ।।
करोति कुपितो मन्दमग्निं संछाद्य मारुतः ।
तस्यान्नं पच्यते दुःखं शुक्तपाकं खराङ्गता ।।
कण्ठास्यशोषः क्षुतृष्णा तिमिरं कर्णयोः स्वनः ।
पार्श्वोरुवंक्षणग्रीवारुजोऽभीक्ष्णं विसूचिका ।।
हृत्पीडा कार्श्यदौर्बल्यं वैरस्यं परिकर्तिका ।
गृध्दिः सर्वरसानां च मनसः सदनं तथा ।।
जीर्णे जीर्यति चाध्मानं भुक्तेस्वास्थ्यमुपैति च ।
स वात गुम्ल हृद्रोग प्लीहाशङ्की च मानवः ।।
चिरादुःखं द्रवं शुष्क तन्वामं शब्दफेनवत्
पुनः पुनः सृजेद्वर्चः कासश्वासार्दितो निलात् ।

च. चि. 15

कटु, तिक्त, कषाय रसात्मक, अति रुक्ष, शीत भोजन अल्प आहारसेवन, अधिक चालणे, वेगधारण, अति मैथुन या कारणानी वायु प्रकुपित होऊन अग्निमंद होऊन ग्रहणी व्याधि होतो या रुग्णाचे अन्न कष्टाने पचते. शुक्तपाक होतो. अंगास रुक्षता येते. कण्ठ, मुख शोष, क्षुधेची भावना, तृष्णा, तमोदर्शन, कर्णनाद, पार्श्व उरू वंक्षण, ग्रीवा या ठिकाणी वरचेवर वेदना, विसूचिके समान लक्षणे, हृदय प्रदेशी पीडा, कार्श्य दौर्बल्य, आस्यवैरस्य, परिकर्तिका, सर्व रसेच्छा, मनोदैन्य निर्माण होते. भोजन पचत असता व पचल्यावर आध्मान हाते. थोडेसे खाल्ल्यावर बरे वाटल्याची भावना होते. रुग्णास वातगुल्म, हृद्रोग किंवा प्लीहारोग झाल्याची शंका येते. मलप्रवृत्ति कष्ट दायक कधी द्रव कधी शुष्क, तनु, सशब्द, फेनिल पुन्हा वेग येणारी अशी असते. रुग्ण, श्वास, कास या लक्षणानी पीडीत असते.

**पित्तज ग्रहणी :-**

**कट्वजीर्ण विदाह्यम्लक्षाराद्यैः पित्तमुल्बणम् ।**
**अग्निमाप्ला वयच्दन्ति जलं तप्तमिवानलम् ।।**
**सोऽजीर्ण निलपीता भं पीताभः सार्यते द्रवम् ।**
**पूत्यम्लोद्गारहृत्कण्ठदाहारुचितृड्र्दितः ।।**

च. चि. 15

कटु, अम्ल विदाही, क्षारादि पदार्थानी, अजीर्णा मुळे पित्ताधिक्य होऊन त्याच्या द्रव गुणाने गरम पाण्याने ही अग्नि विझावा त्या प्रमाणे अग्निमांद्य होते व ग्रहणी व्याधि होतो. यात मल प्रवृत्ति नील, पीताभ, द्रवयुक्त, दुर्गंधीत अशी असते. अम्लोद्गार, हृत्कण्ठदाह, अरुचि, तृष्णा ही लक्षणे आढळतात.

**कफज ग्रहणी :-**

**गुर्वतिस्निग्धशीतादिभोजनादतिभोजनात् ।**
**भुक्तमात्रस्य च स्वप्नाद्धन्त्यग्निं कुपितः कफः ।।**
**तस्यान्नं पच्यते दुःखं हृल्लासच्छर्द्यरोचकाः ।**
**आस्योपदेहमाधुर्यकासष्ठीवनपीनसाः ।।.**
**हृदयं मन्यते स्त्यानमुदरं स्तिमितं गुरु ।**
**दुष्टो मधुर उद्गारः सदनं स्त्रिष्वहर्षणम् ।।**
**भिन्नामश्लेष्म संसृष्टगुरुवर्चः प्रवर्तनम् ।**
**अकृशस्यापि दौर्बल्यमालस्यं च कफात्मके ।।**

च. चि. 15

अति गुरु, स्निग्ध, शीत गुणात्मक भोजन, अतिभोजन, जेवल्यावर त्वरीत निद्रा दिवास्वाप या मुळे कफ प्रकोप होऊन अग्निमांद्य होते व ग्रहणी व्याधि होतो.

रुग्णाचे सेवन केलेले अन्न कष्टाने पचते. हृल्लास, च्छर्दि, अरोचक, मुख लिप्तता, आस्यमाधुर्य, कास, ष्ठीवन, पीनस ही लक्षणे आढळतात. हृदय, उदर गौरव, स्तैमित्य आढळते. दुष्ट, मधुर उद्गार प्रवृत्ति, अंगसाद, मैथुनाची इच्छा न होणे ही लक्षणे असतात. मल प्रवृत्ति, भिन्न, आम-श्लेष्मा मिश्रित, गुरु असते. कार्श्य नसते परंतु दौबल्य व आलस्य ही लक्षणे आढळतात.

**सान्निपातिक ग्रहणी :-**

**पृथग्वातादि निर्दिष्ट हेतुलिंगसमागमे**

**त्रिदोषं निर्दिशेदेवं ।**

मा. नि. ग्रहणी निदानम्

तीन ही दोषांचे हेतु व लक्षणे सान्निपातिक ग्रहणी प्रकारात आढळतात.

## ≬ च्छर्दि ≬

आलेल्या वेगाने आमशयस्थ दोषोत्क्लेश होऊन मुख त्या दोषांनी भरुन जाते त्या वेगामुळे सर्वांग पीडा निर्माण होते व हे दोष मुखावटे बाहेर पडतात. या व्याधीस च्छर्दि असे म्हटले आहे.

छादयान्नाननं वेगैरर्दयन्नंङ्गभञ्जनैः ।
निरुच्यते छर्दिरिति दोषो वक्त्राद्विनिश्चरन् ।।

सु. उ. 49

च्छर्दिव्याधीचे हेतु पुढील आहेत.

अतिद्रवैरति स्निग्धैरहृद्यैर्लवणैरति ।
अकाले चातिमात्रैश्च तथाऽसात्म्यैश्च भोजनैः ।।
श्रमात् क्षयात्थोद्वेगादजीर्णात् कृमिदोषतः ।
नार्यश्चापन्नसत्वायास्तथाऽतिद्रुतमश्नतः ।।
अत्यन्तामपरीतस्य च्छर्दर्वै संभवो ध्रुवम् ।
बीभत्सैर्हेतुभिश्चान्यैर्द्रुतमुत्क्लेशितो बलात् ।।

सु. उ. 49

अतिद्रव, अतिस्निग्ध, अहृद्य, अतिलवण, अकाली, अतिमात्रेत तसेच असात्म्य भोजन सेवन केले असता, श्रम, क्षय उद्‌वेग, अजीर्ण, कृमिदोष, गर्भिणी, अतिशीघ्र भोजन करणे, आमाधिक्य, बीभत्स दृष्य पहाणे या मुळे उत्क्लेश होऊन च्छर्दि उत्पत्ति होते.

च्छर्दि संप्राप्तिचे विश्लेषण पुढील प्रमाणे आहे.

आमाशयोत्क्लेश भवा हि सर्वाश्च्छर्दया मता ।

च. चि. 20.

आमाशय उत्क्लेशामुळे सर्व च्छर्दि होतात.

**दोषानुदीरयन् वृध्दानुदानो व्यानसङ्गतः ।**
**उर्ध्वमागच्छति भृशं विरुध्दाहार सेवनात् ।**

सु. उ. 49

विरुध्द आहारादिंनी प्रकुपित झालेल्या दोषांना व्यानासहित उदान उर्ध्वमार्गाने मुखाने बाहेर टाकतात.
अर्थात च्छर्दि व्याधीच्या संप्राप्तितव्यानासहित उदान वायुचा सहभाग आहे.

च्छर्दिच्या प्रकारानुसार हेतू, लक्षणे व संप्राप्तिचे विवेचन असे आहे.

**वातज च्छर्दि -**

**व्यायाम तीक्ष्णौषधशोकरोगभयोपवासद्यतिकर्शितस्य ।**
**वायुर्महास्त्रोतसि संप्रवृध्द उत्क्लेश्यदोषांस्तत उर्ध्वमस्यन् ।।**
**आमाशयोत्क्लेशकृतांच मर्मप्रपीडयंच्छर्दिमुदीरयेत्तु ।**
**हृत्पार्श्वपीडा मुखशोषमूर्धनाभ्यर्तिकासस्वरभेदतोदैः ।।**
**उद्गार शब्दप्रबलं सफेनं विच्छिन्नकृष्णं तनुकंकषायम् ।**
**कृच्छ्रेण चाल्पंमहता च वेगेनार्तोऽनिलाच्छर्दयतीहदुःखम् ।।**

च. चि. 20

व्यायाम, तीक्ष्ण औषध, शोक, रोग - भय, उपवास इत्यादिनी क्षीण झालेल्या व्यक्तित महास्त्रोतसात वायुप्रकुपित होतो व दोषांचा उत्क्लेश करुन त्यना उर्ध्वमार्गाने मुखाने बाहेर टाकतो. आमाशयात उत्क्लेश करुन मर्मपीडा निर्माण करुन च्छर्दि वेग उदीरण करतो. हृद्पार्श्व शूल, मुखशोष, शिरःशूल, कास, स्वरभेद, तोदवत् वेदना, सशब्द च्छर्दिवेग, सफेन, चोथापाणी स्वरुपाची विच्छिन्न, कृष्णवर्णी, पातळ-तनु, कषाय रसाची अशीच्छर्दि प्रवृत्ति होते - वेग सकष्ट असतात. अल्प प्रमाण पण वेग बरचेवर येणे ही वातजच्छर्दिची लक्षणे होत.

**प्रच्छर्दयेत् फेनिलमल्पमल्पं शूलार्दितोऽभ्यर्दिपार्श्वपृष्ठः ।**
**श्रान्तः सघोषंबहुशः कषायं जीर्णेऽधिकं साऽनिलजावमिस्तु ।।**

सु. 3. 49

फेनिल, अल्प-वरचेवर, अशी वातज च्छर्दि असते. शूल पार्श्वपृष्ठ पीडा, अधिक थकवा ही लक्षणे या रुग्णात आढळतात. सशब्द, प्रायः कषाय रसाची, भोजनजीर्णकालात वेग अधिक असणारी वातज च्छर्दि होय.

**पित्तज च्छर्दि -**

**अजीर्णकट्वम्ल विदाह्यशीतैरामाशये पित्तमुदीर्णवेगम् ।**
**रसायनीभिर्विसृतं प्रपीड्य ममोर्ध्वमाक्ष्स्य वमिंकरोति ।।**
**मूर्च्छापिपासामुखशोषमूर्ध्वताल्वक्षिसंतापतमोभ्रमार्तः ।**
**पीतं भृशोष्णं हरितं सतिक्तं धूम्रंचपित्तेन वमेत् सदाहम् ।।**

च. चि. 20

कटु अम्ल, विदाही, उष्ण गुणानी अजीर्ण झाल्याने पित्तप्रकोप होऊन आमाशयात वेगाने उदीरण होते. रसवह स्त्रोतसाचा क्षोभ, मर्मपीडा होऊन च्छर्दि होते. मूर्च्छा, पिपासा, मुखशोष, शिर, तालु नेत्र दाह, तमप्रवेश, भ्रम ही लक्षणे रुग्णात दिसतात. पीत, हरित वर्णी, कडवट उष्ण, धूरकट असे च्छर्दी स्वरुप असते.

**सोऽम्लं भृशं वा कटुतिक्तपीतं सरक्तं हरितं वमेद्वा ।**
**सदाहचोषज्वरवक्रशोषो मूर्च्छान्वितः पित्तानिमित्तजा सा ।।**

सु. 3. 49

अम्ल, कटु, तिक्त रसात्मक, अधिक मात्रेत पीत, हरित वर्णी, सरक्त अशी पित्तजच्छर्दि असते. दाह, चोष, ज्वर, शोष, मूर्च्छा ही लक्षणे रुग्णांत आढळतात.

कफज च्छर्दि -

स्निग्धाति गुर्वामविदाहिभोज्यैः स्वप्नादिभिश्चैवकफोऽतिवृध्दः ।
उरःशिरो मर्म रसायनीश्च सर्वाःसमावृत्य वमिंकरोति ।।
तन्द्रास्यमाधुर्यकफप्रसेकसंतोषनिद्रारूचिगौरवार्तः ।
स्निग्धं घनं स्वादु कफाघ्दिशुध्दं सलोमहर्षोऽल्परुजं वमेत्तु ।।

च. चि. 20

अति स्निग्ध अतिगुरु आम विदाहि भोजन अधिक निद्रा कफ अधिक वृध्द करते. उर, शिर, मर्म रसवाहिन्या अेकत्रित पीडित होऊन च्छर्दि निर्माण करतात. तंद्रा, मधुरास्यता, कफप्रसेक, तृप्ति, अधिक निद्रा, अरुचि, गौरव ही लक्षणे रुग्णात आढळतात. स्निग्ध, घन, स्वादु, कफयुक्त अशी च्छर्दि, रोमहर्ष अल्परुजा सहित असते.

यो हृष्टरोमा मधुरं प्रभूत शुक्लंहिमं सान्द्रकफानुविध्दम् ।
अभक्तरुग्गौरव सादयुक्तो वमेद्वमी सा कफकोपजा स्यात् ।।

सु. 3. 49

सरोमहर्ष, मधुर, प्रभूत, शुक्लवर्णी, शीतस्पर्शी, घन, कफमिश्रित, अन्नअरुचि, गौरवसादयुक्त अशी कफज च्छर्दि असते.

सान्निपतिक च्छर्दि -

समश्नतः सर्वरसान् प्रसक्त मामप्रदोषर्तुविपर्ययैश्च ।
सर्वे प्रकोपं युगपत् प्रपन्नाच्छर्दिं त्रिदोषांजनयन्ति दोषाः ।।
शूलाविपाकारुचिदाहतृष्णाश्वासप्रमोहप्रबला प्रसक्तम ।
च्छर्दिस्त्रिदोषाल्लवणाम्लनीलसान्द्रोष्णरक्तंवमतांनृणांस्यात ।।

सर्वरसांचे अेकत्रित सेवन ( पथ्य अपथ्यांचे अेकत्रित भोजन ) आमाधिक्य, ऋतुविपर्यय या कारणानी सर्व दोष अेकत्रित प्रकुपित होऊन त्रिदोषजच्छर्दि निर्माण करतात. शूल, अविपाक, अरुचि, दाह, तृष्णा, श्वास, मोह ही लक्षणे प्रबल असतात. च्छर्दिचे स्वरुप लवण, अम्ल, नील, घन, उष्ण, रक्तयुक्त असे असते.

**द्विष्टार्थजा च्छर्दि -**

**द्विष्टप्रतीपाशुचिपूत्यमेध्यबीभत्सगन्धाशनदर्शनैश्च ।**
**च्छर्दियेत्तत्प्रमना मनोघ्नैर्द्विष्टार्थसंयोगभवामता सा ।**

तिटकारा आणणारे, विरुध्द, अशुध्द, नासलेले, बीभत्स असे अन्न, गन्ध दर्शनाने व सेवनाने मनास उबग आणून च्छर्दि करविते. असे अन्न पुढे आले तरी तिटका-यानेच्छर्दि होते.

## ) अतिसार (

**सोऽतिसारोऽति सरणात् ।**

वा. नि. 8

**गुदेन बहूद्रवसरणं अतिसारः ।**

मा. नि. अतिसार निदानम्

गुदमार्गाने द्रवाचे अतिसरण होते म्हणून यास अतिसार म्हटले आहे.

या व्याधी हेतु असे वर्णिले आहेत.

**गुर्वतिस्निग्धरुक्षोष्णद्रव स्थूलातिशीतलैः ।**
**विरुध्दाध्यशनाजीर्णेर्विषमैश्चापि भोजनैः ।।**
**स्नेहाद्यैरतियुक्तेश्च मिथ्यायुक्तैर्विषैर्भयैः ।**
**शोकाद्दुष्टाम्बुमद्यातिपानैः सात्म्यर्तुपर्ययैः ।।**
**जलाभिरमणैर्वेग विघातैः क्रिमिदोषतः ।**
**नृणां भवत्यतीसारो ............ ।।**

सु. 3. 40

गुरु, अतिस्निग्ध, रुक्ष, उष्ण, द्रव, स्थूल, अतिशीत गुणात्मक पदार्थ सेवन, विरुध्दाशन, व मिथ्यायोगामुळे विषभय, शोक, दुष्टजल, अतिमद्यपान, ऋतुविपर्यय, अधिक पोहणे, वेगविधारण, कृमिदोष या कारणांमुळे अतिसार व्याधि होतो.

**अतिसाराची संप्राप्ति अशी आहे.**

**संशम्यापां धातुरग्निं प्रवृध्दः शकृन्मिश्रो वायुनाऽधः प्रणुन्नः ।**
**सरत्यतीवातिसारं तमाहुर्व्याधिं घोरं षड्विधं तं वदन्ति ।।**
**एकैकशः सर्वशश्चापि दोषैः शोकेनान्यः षष्ठ आमेन चोक्तः ।।**

मा. नि. अतिसार निदानम् ।

वृध्द अप्धातूला प्रकुपित वायु खेचून कोष्ठात आणतो यामुळे अग्नि मंद होतो. पुरिषास द्रवता येऊन वायुच्या प्रेरणेने पुरिषामिश्रित अप्धातूचे गुदमार्गाने अतिसरण होते. अतिसार सहा प्रकारचा वर्णिला आहे. एकदोषज तीन, सन्निपातिक, शोकज व आमज हे सहा प्रकार होत. अतिसार व्याधीचा स्थानसंश्रय ग्रहणी या अवयवात हे संप्राप्तिवरुन सुस्पष्ट आहे.

प्रकारानुसार लक्षणे पुढील प्रमाणे वर्णिली आहेत.

**अरुणं फेनिलं रुक्षमल्पमल्पं मुहुर्मुहुः ।**
**शुकृंदामं सरुक्शब्दं मारुतेनातिसार्यति ।।**

मा. नि. अतिसार निदानम् ।

अरुणवर्णी, सफेन, रुक्ष अल्प मात्रेत वारंवार, साम, सशब्द अशी अतिमलप्रवृत्ति वातातिसारात होते.

चरकाचार्यांनी चिकित्सास्थानं एकोणीसाव्या अध्यायात मूत्रवात अवरोध, कोष्ठवायुसंचरणामुळे शूल ही अधिक लक्षणे साम वातातिसारात वर्णन केली आहेत तर निराम वातातिसारात मल प्रवृत्ति बांधून व थोडीथोडी होते, परिकार्तिका, रोमहर्ष, धापलागणे, मुखशुष्कता, कटि,उरु, त्रिक, जानु, पृष्ठ पार्श्वशूल, गुदभ्रंश वरचेवर ग्रथित मलप्रवृत्ति होणे ही लक्षणे वर्णिलेली आहेत.

पित्तातिसार -

**पित्तात्पीतं नीलमालोहितं वा तृष्णामूर्च्छादाहपाकोपपन्नम् ।**

मा. नि. अतिसार निदानम् ।

पीत, नीलवालोहित वर्णीमल प्रवृत्ति, तृष्णा, मूर्च्छा, दाह, गुदपाक ही लक्षणे आढळतात.

चरकाचार्यांनी या व्यतिरिक्त मलप्रवृत्तिचा वर्ण हरित, हारिद्र, कृष्ण तसेच दुर्गंधीयुक्त मल असे वर्णिले आहे. पित्तातिसारी व्यक्तिने पित्तवर्धक अन्नपानाचे सेवन सुरु ठेवल्यास पित्त अधिक प्रकुपित होऊन रक्तास दुषित करुन रक्तातिसार उत्पन्न करते. यात तृष्णा, शूल, विदाह, गुदपाक ही लक्षणे अधिकतीव्र असतात.

कफातिसार -

**शुक्लं सान्द्रं श्लेष्मयुक्तं विस्त्रं शीतं हृष्टरोमामनुष्यः ।**

**मा. नि.**

श्वेत, सान्द्र, श्लेष्मायुक्त, आमगंधी, शीत, मल व रोमहर्ष ही लक्षणे रुग्णात आढळतात.

चरकाचार्यांनी स्निग्ध, पिच्छिल, तन्तुयुक्त, आमयुक्त. गुरु ही अधिकची लक्षणे वर्णिली आहेत. मलप्रवृत्ति सप्रवाहण असणे, उदर, गुद बस्ति प्रदेशी गौरव, मलप्रवृत्ति होऊन ही न झाल्याची संवेदना, उत्क्लेश, निद्रा, आलस्य, अंगसाद, अन्नद्वेष ही लक्षणेही वर्णिली आहेत.

सान्निपातिक अतिसार -

वराहस्नेहमांसाम्बुसदृशं सर्वरूपिणम् ।
कृच्छ्रसाध्यमतीसारं विद्यात्दोषत्रयोद्भवम् ।।

मा. नि.

वराहस्नेहमांस धुतलेल्या पाण्याप्रमाणे स्वरुप असणारी सान्निपातिक अतिसाराच्या रुग्णाची मलप्रवृत्ति असते. हा कष्टसाध्य अतिसार प्रकार आहे.

चरकाचार्यानुसार मंदाग्नि व अरुचि ही लक्षणे वर्णिली आहेत. या प्रकारात रक्तादि धातुदुष्टि अधिक्याने असल्याने मलाचे स्वरुप वरील प्रमाणे आढळते.

**शोकज अतिसार -**

**तैस्तैर्भावैः शोचतोऽल्पाशनस्य बाष्पोष्मा वै वह्निमाविश्यजन्तोः ।**
**कोष्ठंगत्वा क्षोभयेत्तस्य रक्तं तच्चाधस्तात्काकणन्तीप्रकाशम् ।।**
**निर्गच्छेद्वै विड्विमिश्रं ह्यविड्वा निर्गंधं वा गन्धवद्वाऽतिसारः ।**
**शोकोत्पन्नो दुश्चिकित्स्योऽतिमात्रं रोगो वैद्यैःकष्ट एष प्रदिष्टः ।।**

मा. नि.

धन, बंधुनाशादि कारणानी शोक करणा-या अल्प आहार घेणा-या व्यक्तित बाष्पोष्मा कोष्ठात जाऊन अग्निदुष्टि करुन रक्तासही क्षुब्ध करतो. व गुंजा फलसमान रक्तकृष्णवर्णी चमकदार असे रक्त मलाशी मिश्रित होऊन कधीर्निगंध कधी गंधयुक्त असे अतिसरण होते.
हा ही प्रकार दुश्चिकित्स्य व कष्टसाध्य आहे.

चरकाचार्यांनी आगंतुज अतिसारात या प्रकाराचा समावेश केलेला आहे.

**आमज अतिसार -**

**अन्नाजीर्णात्प्रद्रुताः क्षोभयन्तः कोष्ठंदोषाधातुसंघान्मलाश्च ।**
**नानावर्णं नैकशः सारयन्ति शूलोपेतं षष्ठमेनं वदन्ति ।।**

मा. नि.

अन्न अजीर्णावस्थेत आमाशयात पडून राहिल्याने कोष्टाचा क्षोभ करुन दोषांना ही क्षुब्ध करतात. या दोषांमुळे धातु, मल ही क्षुब्ध होऊन नानावर्णयुक्त मलाचे सशूल निस्सरण होते.

## ( परिणाम शूल )

परिणाम शूलाचे निदान व संप्राप्तिचे विवेचन असे आहे.

**कफपित्त समावृत्य शूलकारी भवेब्दली ।**
**भुक्ते जीर्यति यच्छूलं तदेव परिणामजम् ।।**

मा. नि. शूलादिनिदानम् ।

स्वकारणानी प्रकुपित झालेला वायु, प्रकुपित कफ व पित्ताशी साहचर्य करुन अधिक बलवान होतो व आहाराच्या पचनकाली अर्थात परिणमनकाली जो शूल निर्माण करतो तो परिणाम शूल होय.

**याची लक्षणे पुढील प्रमाणे :-**

**आध्मानाटोपविण्मूत्र विबन्धारतिवेपनैः ।।**
**स्निग्धोष्णोपशमप्रायः वातिकं तद्वदेद्भिषक् ।**
**तृष्णादाहारतिस्वेदं कट्वम्ललवणोत्तरम् ।।**
**शूलं शीतशमप्रायं पैत्तिकं लक्षयेद्बुधः ।**
**च्छर्दिहृल्लाससंमोहं स्वल्परुग्दीर्घसन्तति ।।**
**कटुतिक्तोपशान्तं च तच्च ज्ञेयं कफात्मकम् ।**
**संसृष्ट लक्षणं बुद्ध्वा द्विदोषं परिकल्पयेत् ।।**
**त्रिदोषजमसाध्यं तु क्षीणमांसबलाबलम् ।**

मा. नि. शूलादिनिदानम् ।

परिणामशूलात वात प्रधान त्रिदोष असतात. परंन्तु दोषाधिक्याने भिन्न लक्षणे आढळतात. वात प्राधान्य असता आध्मान, आटोप विण्मूत्रविबन्ध, अरति, कंप व स्निग्धोष्ण उपचारानी बरे वाटणे

ही लक्षणे आढळतात. पित्त प्राधान्य असता तृष्णा, दाह, अरुचि, स्वेद तसेच कटु, अम्ल, लवण रस सेवनाने शूल वाढणे व शीत गुणाने कमी होणे ही लक्षणे दिसतात.

कफ प्राधान्यात च्छर्दि, हृल्लास, संमोह, वेदना कमी पण दीर्घकाल टिकणा-या असणे व कटु तिक्तरसाने बरे वाटणे ही लक्षणे आढळतात.

द्वंद्वजात दोन दोषांची तर सन्निपातात तीन दोषांची लक्षणे असतात. त्रिदोषात रुग्णांची मांसक्षीणता, बलक्षीणता असल्यास असाध्य समजावे.

## ॥ अम्लपित्त ॥

------

अम्लगुणाने उद्रिक्त पित्त म्हणजेच अम्लपित्त होय.

अम्ल गुणोद्रिक्तं पित्तं अम्लपित्तम् ।

मा. नि. अम्लपित्त निदानम् ।

अम्लपित्ताचे हेतु पुढील प्रमाणे वर्णिले आहेत.

विरुध्द दुष्टाम्लविदाहिपित्तप्रकोपिपान्नभुजो विदग्धम् ।
पित्तं स्वहेतूपचितं पुरा यत्तदम्लपित्तं प्रवदन्ति सन्तः ।

मा. ना. अम्लपित्त निदानम् ।

विरुध्द, दुष्ट, अम्ल, विदाहि, विदग्ध, पित्तप्रकोपक आहार, पेये सेवन केली असता वर्षाऋतुमध्ये स्वअम्लविपाकित्व असल्याने पित्त संचय झाल्याने अम्लपित्त व्याधि होतो.

विरुध्दाध्यशनाजीर्णादामे चामे च पूरणात् ।
पिष्टान्नामपक्वानां मद्यानां गोरसस्य च ।।
गुर्वभिष्यान्दिभोज्यानां वेगानां धारणस्य च ।
अत्युष्णस्निग्धरुक्षाम्लद्रवाणामतिसेवनात् ।।
फणितेक्षुविकाराणां कुलत्थानां च शीलनात् ।
भृष्टधान्यपुलाकानां पृथुकानां तथैव च ।।
भुक्ता भुक्त्वा दिवास्वप्नादतिस्नानावगाहनात् ।
अन्तरोदकपानाच्च भुक्तपर्युषिताशनात् ।

काश्यप खिलस्थान ।6

विरुध्दाशन, अध्यशन, अजीर्ण तसेच शरीरात आमरस किंवा आम आहार असता पुन्हा भोजन करणे पिष्टान्न, अपक्व मद्य, दुग्ध, गुरु, अभिष्यंदी भोजन, वेगधारण, अत्युष्ण, स्निग्ध रुक्ष, अम्ल, द्रवाधिक्य सेवन काकवी, उसापासून बनविलेले पदार्थ, कुळीथ, भृष्ट धान्य, क्षुद्रधान्य, पोहे, जेवल्यावर लगेच दिवास्वाप अति उष्णोदक स्नान, भोजनात अधिक पाणी पिणे, पर्युषित अन्नसेवन करणे ही आम्लपित्ताची कारणे होत.

आनूप देशात प्रायशः अम्लपित्त व्याधि होतो. पित्ताचा द्रव गुण वाढविण्यास या देशातील अधिक आर्द्रतेची मदत होते.

अम्लपित्ताची संप्राप्ति अशी आहे.

**वातादयः प्रकुप्यन्ति तेषामन्यतमो यदा ।।**
**मन्दीकरोति कायाग्निम् मार्दवमागते ।।**
**एतान्येव तथा भूयः सेवनामस्य दुर्मतेः ।**
**यत्किञ्चिदशितं पीतं देहिनस्तध्दि दह्यति ।।**
**विदग्धं शुक्ततां याति शुक्तमामाशये स्थितम् ।**
**तदम्लपित्तमित्याहुर्भूयिष्ठं पित्तदूषणात् ।।**

काश्यप खिलस्थान ।6

पित्त वातादि दोष प्रकुपित होऊन अग्निमांद्य निर्माण करतात. अग्निमांद्य असतांना अपथ्यकर आहारविहार सुरु राहीला तर अधिक विदग्धावस्था निर्माण होते. विदग्धावस्थेमुळे अम्लता निर्माण होऊन आमाशयात स्थित रहाते. यास अम्लपित्त म्हण्टले आहे.

अम्लपित्ताची लक्षणे अशी आढळतात.

**विड्भेदो गुरुकोष्ठत्वमम्लोत्क्लेशः शिरोरूजा ।**
**ह्यच्छूलमुदराध्मानमङ्गसादोऽन्त्रकूजनम् ।**
**कण्ठोरसी विदह्येते रोमहर्षश्च जायते ।**
**सामान्यलक्षणं त्वेतद्विशेषश्चोपदेक्ष्यते ।**

काश्यप खिलस्थान ।6

द्रवमल, गुरु कोष्ठता, अम्ल उत्क्लेश, शिरःशूल, ह्च्छूल, आध्मान, अङ्गसाद, आंत्रकूजन, रुग्णास कण्ठ, उरःप्रदेशी दाह, रोमहर्ष ही सामान्यलक्षणे आढळतात.

**अविपाकक्लमोत्क्लेशतिक्ताम्लोद्गारगौरवैः ।**
**हृत्कण्ठदाहारुचिभिश्चाम्लपित्तं वदेद्भिषक् ।।**

मा. नि. अम्लपित्त निदानम् ।

अविपाक, क्लम उत्क्लेश, तिक्त, अम्ल उद्गार, गौरव, हृत्कण्ठदाह, अरुचि ही अम्लपित्ताची लक्षणे होत. अम्लपित्तात पित्तदोष प्रधान आहे. वात व कफ दोष अनुबंध असता गौरव उद्गार, कम्प ही लक्षणे आढळतात.

विशेष लक्षणे पुढील प्रमाणे :-

**वाताच्छूलाङसादौ च जृम्भा स्निग्धोपशायिता ।**

**पित्ताद्भ्रमो विदाहश्च स्वादुशीतोपशायिता ।।**

**कफाद् गुरुत्वं च्छर्दिश्च स्याद्रूक्षोष्णोपशायिता ।**

काश्यपखिल ।6

वातामुळे शूल अंगसाद, जृंभा ही लक्षणे असून स्निग्धाने उपशय मिळतो. पित्तामुळे भ्रम, विदाह व मधुराशीताने उपशय मिळतो. श्लैष्मिकात गुरुत्व, च्छर्दि ही लक्षणे असून रुक्ष व उष्णाने उपशय मिळतो.

गतीभेदाने अम्लपित्त दोन प्रकारचे मानले आहे. उर्ध्वगामी अम्लपित्तातपुढील लक्षणे आढळतात.

**वान्तं हरित्पीतकनीलकृष्णमारक्तरक्ताभमतीवचाम्लम् ।**

**मांसोदकाभं त्वतिपिच्छलाच्छं श्लेष्मानुजातं विविधं रसेन ।।**

**भुक्ते विदग्धे त्वथवाऽप्यभुक्ते करोति तिक्ताम्लवमिं कदाचित् ।**

**उद्गारमेवंविधमेव कण्ठहृत्कुक्षिदाहं शिरसो रुजं च ।।**

**करचरणदाहमौष्ण्यं महतीमरुचिं ज्वरं च कफपित्तम् ।**

**जनयति कण्डूमण्डलपिडकाशतनिचितगात्ररोगचयम् ।**

मा. नि. अम्लपित्त निदानम् ।

उर्ध्वग अम्लपित्तात च्छर्दि हे प्रधान लक्षण आढळते. च्छर्दि हरित, पीत, नील, कृष्ण, रक्त, रक्ताभ वर्णी, अती अम्ल असते. मांस धुतलेल्या पाण्याप्रमाणे पिच्छिल किंवा अच्छ असते. लवण, कटु, तिक्त अशा विविध रसयुक्त असते. भोजन घेतल्यावर विदग्ध झाले असता अथवा काही न खाताही तिक्त , अम्ल च्छर्दि होते. विविध उद्गार, कण्ठ, ह्दय, कुक्षी, दाह, शिरशूल, हस्तपाददाह, औष्ण्य, तीव्र अरुचि ज्वर, कण्डू मण्डल, पिडका इत्यादि लक्षणे निर्माण होतात.

तसेच अविपाक, उत्क्लेशादि रोगांचा संचय होतो.
अधोगामी अम्लपित्तात पुढील लक्षणे वर्णिली आहेत.

**तृड्दाहमूर्च्छा भ्रममोहकारि प्रयात्यधो वा विविधप्रकारम् ।**
**ह्ल्लासकोठानलसादहर्षस्वेदाङ्गपीतत्वकरं कदाचित् ।।**

मा. नि. अम्लपित्त निदानम् ।

तृष्णा, दाह, मूर्च्छा, भ्रम, मोह ही लक्षणे आढळतात. मलप्रवृत्ति विविध प्रकारची अर्थात् हरित, पीत, कृष्ण, रक्तादि बहुवर्णी, दुर्गंधीयुक्त अशी असते. रुग्णात कधी ह्ल्लास, कोठ, अग्निमांद्य, रोमहर्ष, स्वेद, अंगपीतता ही लक्षणेही आढळतात.

माधवनिदानात अम्लपित्त व्याधीमध्ये दोषानुबंधाचे वर्णन केलेले आहे. वातानुबंधी, कफानुबंधी व वातकफानुबंधी अम्लपित्ताची लक्षणे उल्लेखिलेली आहेत. ती अशी -

कंप, प्रलाप, मूर्च्छा, गात्र चिमचिमायन, गात्र अवसाद, शूल, तमोदर्शन, विभ्रम, मोह, रोम हर्ष ही लक्षणे वातानुबंधी आम्लपित्तात आढळतात.

कफ निष्ठीवन, गौरव, जडता, अरुचि, शैत्य मुखलिप्तता, अग्निसाद, बलसाद, कण्डू, निद्रा ही लक्षणे कफानुबंधी अम्लपित्तात आढळतात.

तर वरील दोन्ही दोषानुबंधाची एकत्रित लक्षणे वातकफानुबंधी अम्ल पित्तात आढळतात .

* * * * *